# <u>यंत्रमाग सहकारी संस्थांची सद्यस्थिती बाबतची माहीती</u>

( दि. ३१/३/२००९ अखेर)

**प्रस्तावना**

महाराष्ट्र राज्यात एकूण ९.२४ लाख यंत्रमाग आहेत.हे यत्रमाग राज्यातील विशेषतः भिवंडी, मालेगांव, इचलकरंजी,सोलापूर व नागपूर या क्षेत्रात एकवटलेले आहेत. राज्यात असलेल्या यंत्रमागापैकी सुमारे ८० टक्के यंत्रमाग जुने इंग्लीस बनावटीचे असून अधिकतर यंत्रमाग जून्या कापड गिरण्यामधून मोडून काढलेले किंवा स्थानिक उत्पादकाकडून तयार केलेले आहेत.

राज्यात सुमारे ७० टक्के यंत्रमाग खर्ची पध्दतीने कार्यरत असून या पध्दतीत यंत्रमाग धारक पेढीवाले व्यापा-याकडून सूत घेवून एका ठराविक मजूरीच्या दराने कापड तयार करून देतात. राज्यात यंत्रमाग उद्योग धंदयामूळे सूमारे १० लाख लोकांना अप्रत्यक्ष स्वरूपात रोजगार उपलब्ध होत आहे.

**<u>राज्य शासनाचे उत्पन्न</u>**

राज्यात असलेल्या यंत्रमागाची वार्षिक उत्पादन क्षमता सूमारे १००० कोटी मिटर्स कापडाची आहे.

राज्यात असलेल्या लोकसंख्येचा विचार करून प्रति व्यक्ती सूमारे १५ मिटर्स प्रती वर्ष कापडाची आवश्यकता गृहीत धरल्यास राज्यात लोकसंख्येकरीता कापडाची वार्षिक गरज सूमारे ११२.५० कोटी मिटर्सची आहे. त्यामुळे यंत्रमागाची कापड उत्पादन क्षमता राज्यातील कापड आवश्यकतेच्या तुलनेत ९ पटीने अधिक आहे.

राज्यात उत्पादीत होणा-या कापडाचा विचार केल्यास यंत्रमागावरील तयार होणारे ९० टक्के कापड इतर राज्याला किंवा परदेश बाजारपेठेला निर्यात करण्यात येतात.त्यामुळे सरासरी २० रूपये प्रती मिटर कापडाचे दर गृहीत धरल्यास राज्याचे अर्थव्यवस्थेत सुमारे १७७५० कोटी रूपयांची वार्षिक भर यंत्रमाग उद्योगामुळे होत आहे.

यंत्रमाग उद्योगाला वार्षिक सुताची गरज सुमारे ८६.४९ कोटी किलोची आहे. त्यामुळे यंत्रमाग उद्योगाला लागणा-या ८५ टक्के सुताची गरज इतर राज्याकडून उत्पादीत होणा-या सूत व मानव निर्मीत धाग्याची पूर्ततेमुळे होत आहे.

**<u>सद्यस्थिती व प्रचलीत धोरण</u>**

राज्यातील यंत्रमाग उद्योग धंदयाच्या विकासा करीता तसेच नविन यंत्रमागाच्या प्रकल्पाची उभारण्ी करून दर्जेदार उत्पादन करणे शक्य व्हावे म्हणून राज्य शासनाने राष्ट्रीय सहकारी विकास निगम पुरस्कृत अर्थसहाय्य योजना राज्यात सन १९९५-९६ या आर्थिक वर्षापासून अंमलात आणलेली आहे. योजनेअंतर्गत खालील शिर्षकानूसार अर्थसहाय्य उपलब्ध करून देण्याची तरतूद आहे.

| अ.क्र | तपशिल | निगमाकडून राज्य शासनाला कर्ज | राज्य शासनाकडून सहकारी संस्थेला कर्ज |
|---|---|---|---|
| १) | मार्जीन मनी /भाग भांडवलासाठी अर्थसहाय्य | १०० टक्के कर्ज | ५० टक्के कर्ज<br>५० टक्के भागभांडवल |
| २) | माग खरेदी/शेड बांधकाम/आधूनिकीकरण/ नूतनीकरण/बांधकाम/गोदाम उभारणी/मार्केटींग कॉम्लेक्स सहकारी वस्त्रोद्योग इस्टेट | ९० टक्के कर्ज | ५० टक्के कर्ज<br>४० टक्के भागभांडवल<br>१० टक्के सभासद वर्गणी |
| ३) | मागावर येणे आधीची अथवा नंतरची प्रक्रिया/ तयार कपडे/विणाई केंद्र यांची स्थापना | ९० टक्के कर्ज | ५० टक्के कर्ज<br>४० टक्के भागभांडवल<br>१० टक्के सभासद वर्गणी |

**<u>उपलब्ध करून देण्यात आलेले अर्थसहाय्य</u>**

वरील योजनेअंतर्गत दि. ३१/३/२००९ पर्यंत राष्ट्रीय सहकारी विकास निगम यांनी अर्थसहाय्यासाठी ४२० यंत्रमाग सहकारी संस्थांच्या प्रस्तावांना मंजूरी दिलेली असून त्यापैकी ४१९ संस्थांना राज्यशासनाने अर्थसहाय्य मंजूर केलेले आहे. त्या मध्ये शासकिय भागभांडवल रूपये ९३८६.३४ लाख व रासविनी कर्ज रूपये २१३४९.०१ लाख असे एकूण रूपये ३०७३५.६८ लाखांचा समावेश आहे.

शासनानी यंत्रमाग संस्थांना उपलब्ध करून दिलेल्या अर्थसहाय्याचे विवरण खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र | तपशिल | संस्था | शासकिय भागभांडवल | रा.स.वि.नी. कर्ज | एकुण |
|---|---|---|---|---|---|
| १ | प्रकल्प उभारणी | ३३९ | ८६३२.६१ | २०९४७.६१ | २९५८०.५५ |
| २ | दुरावा रक्कम | ८० | ७५३.७३ | ४०१.४० | ११५५.१३ |
| | एकूण | ४१९ | ९३८६.३४ | २१३४९.०१ | ३०७३५.६८ |

प्रकल्पाची उभारणीकरीता एकुण ३३९ संस्थांना रासविनीनी मंजूरी दिली असून त्यापैकी ३३८ संस्थांना अर्थसहाय्य उपलब्ध करून दंण्यात आले आहे, त्यापैकी २९४ संस्थांना अर्थसहाय्याची पूर्ण रक्कम उपलब्ध करून देण्यात आली असून ४४ यंत्रमाग संस्थांना अर्थसहाय्याचा पहीला व दुसरा हप्ता उपलब्ध करून देण्यात आला उर्वरीत १ संस्थेला राज्यशासनांने अर्थसहाय्य वितरीत करणे शिल्लक आहे. तसेच रासविनी योजनेअंतर्गत ८१ संस्थांना दूरावा रक्कम मंजूर करण्यांत आली असून राज्यातील ८० यंत्रमाग सहकारी संस्थांना दुरावा रक्कम अर्थसहाय्य उपलब्ध करून देण्यात आलेले आहे. तसेच वरील प्रकल्प मंजूर ४६ यंत्रमाग  संस्थांना शासकिय भागभांडवल रूपये ६९९.०० लाख व रासविनी कर्ज रूपये २०७३.६७ लाख असे एकूण रूपये २७७२.६७ उपलब्ध करून दयावयाचे आहेत.

**<u>यंत्रमाग संस्थांना वितरीत अर्थसहाय्य व वसूलीचा आढावा.</u>**

मार्च २००९ अखेर पावेतो ४१९ यंत्रमाग संस्थाकडून खालील प्रमाणे रकमा वसूलीस पात्र आहेत.

| अ.क्र. | विवरण | वसूलीस पात्र | वसूली | थकित रकमा |
|---|---|---|---|---|
| १) | शासकिय भा. भा. | ३९८९.८५ | १४८.९९ | ३८४०.८६ |
| २) | रासविनी कर्ज | ७७१४.३६ | ३०४.९४ | ७४०९.४२ |
| ३) | कर्जावरील व्याज | १५९८३.११ | ६५४.४१ | १५३२८.७० |
| | एकूण | २७६८७.३२ | ११०८.३४ | २६५७८.९८ |

**<u>वसूलीबाबत करण्यांत आलेली कार्यवाही :-</u>**

शासन निर्णय दि. २४/२/१९९९ नूसार सदर संस्थांकडून वसूली करण्याची जबाबदारी सबंधीत प्र्रादेशिक उपसंचालक यांचेवर सोपविण्यांत आलेली आहे. थकित रकमेच्या वसूली करीता म.स.संस्था कायदा १९६० चे कलम १५५ अंतर्गत १०० संस्थांना प्रादेशिक उपसंचालक सोलापूर यांनी नोटीस दिलेल्या आहेत. तसेच प्रादेशिक उपसंचालक नागपूर, मुंबई, व औरंगाबाद यांना त्याचे कार्यक्षेत्रातील संस्थाकडील वसूलीचे प्रमाण वाढविण्या करीता म.स.संस्था कायदा १९६० चे कलम १५५ अंतर्गत त्वरीत नोटीसा पाठविणेबाबत कळविण्यांत आलेले आहे. तसेच ज्या संस्थाचे उत्पादन बंद आहे अशा संस्थांचा आढावा घेवून त्या पून्हा सूरू होण्याचे दिसून येत नसल्यास अशा संस्थांना अवसायनांत घेवून वसूलीची कार्यवाही करावी अशा सूचना देण्यांत आलेल्या आहेत.

**<u>अडीअडचणी व उपाय योजना</u>**

तदनंतर खुल्या अर्थव्यवस्थेत जागतीक बाजार पेठेला तोंड देण्याकरीता राज्यातील यंत्रमाग उद्योगधंदयांना प्रोत्साहन देणे, नूतणीकरण करणे व पायाभूत सुविधा उपलब्ध करून देणे अत्यंत गरजेचे आहे. कारण राज्यात सध्या कार्यरत असलेले यंत्रमाग जुन्या स्वरूपाचे किंवा स्थानिक उत्पादकाकडून तयार केलेले यंत्रमाग असून सदर यंत्रमागावर जागतीक बाजार पेठेतील गुणवत्तेनूसार कापडाचे उत्पादन करणे शक्य नाही.

तसेच राज्यातील अधिक प्रमाणावरील यंत्रमाग खर्ची पध्दतीने कार्यरत असल्याने सदर यंत्रमाग पेढीवाले व्यापा-यांच्या नियंत्रणाखाली सुरू आहेत. जागतीक बाजारपेठेत मागणीनूसार कापडाचे उत्पादन करावयाचे झाल्यास सदर यंत्रमागाने स्वतंत्रपणे उत्पादन कार्यक्रम राबविने आवश्यक असून त्यांना खेळते भांडवल किवा खेळते भांडवल उभारणी करीता दुरावा रक्कम उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.

या व्यतिरीक्त सदर यंत्रमागांना सक्षम करण्याकरीता व नविन तंत्र विज्ञानापासून त्याना अवगत करून देणेकरीता केंद्र शासनाच्या सहाय्यतेने यंत्रमाग केंद्रात प्रशिक्षण केंद्र सुरू करून यंत्रमाग धारकांना प्रशिक्षण दंण्याकरीता कार्यक्रम सुरू करणे देखील आवश्यक आहे.

वरील परिस्थितीत राष्ट्रीय सहकारी विकास निगम योजना पून्हा सूरू करून विकेंद्रीत क्षेत्रात असलेले यंत्रमागाचे सहकारीकरण करणे व विकसीत यंत्रमाग उपलब्ध करून देणे अत्यंत आवश्यक झालेले आहे. जागतीक बाजारपेठेत स्पर्धा करावयाची असल्यास शटललेस व रॅपीअर लूम यंत्रमाग क्षेत्राला उपलब्ध करून देणे पोषक ठरेल. त्याशिवाय यंत्रमाग उद्योगाला चालना मिळून जागतीक बाजार पेठेला तोंड देणे शक्य होणार नाही.

**यंत्रमागाबाबतची माहीती**

| अ.क्र | विभाग | यंत्रमागाची संख्या |
|---|---|---|
| १) | मुंबई | ७,७६,२९२ |
| २) | नाशिक | २८,८५६ |
| ३) | पूणे | ६९,५६७ |
| ४) | औरंगाबाद | ५६५० |
| ५) | अमरावती | २०८९ |
| ६) | नागपूर | ३१८५ |
| | एकूण | ९,२५,३४१ |